दाखल दिनांक : ०६/०६/२०११
नोंदणी दिनांक : ०६/०६/२०११
निकाल दिनांक : २७/०५/२०१५
कालावधी : व म दि
०३ ११ २१

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, ठाणे यांचे न्यायालयात**
(पिठासीन अधिकारी : प्र.प्र.भारसाकडे—वाघ, ६वे न्यायालय)

**नियमित फौजदारी खटला क्र. :७६२/२०११**
संगणकीय नोंदणी क्र : ०४०७६२/२०११
**निशाणी क्र : ८**

**महाराष्ट्र शासन**
(ठाणे अंमलदार, श्रीनगर पोलिस ठाणे, यांचेद्वारा). ... **अभियोग पक्ष**

**विरुध्द**

**प्रकाश रमेश भुरकूड**
वय २५ वर्षे,
रा. श्रीनगर, वारलीपाडा,
पाण्याचे टाकी जवळ,
वागळे इस्टेट, ठाणे ... **आरोपी**

**उपस्थिती :** अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती. चंदणे
आरोपीतर्फे वकील श्री जी. जी. धावरे

**: न्यायनिर्णय :**
**(दिनांक २७ मे, २०१५ रोजी जाहीर केला)**

आरोपीवर भारतीय दंड विधान कलम ३२४ अन्वये दोषारोप ठेऊन खटला चालविण्यात आला.

२. अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत पुढीलप्रमाणे.

दिनांक २७/१०/२०१० रोजी १२.३० वा. सुमारास फिर्यादी चिताबाई गोविंद मोरे हया त्यांच्या वारली पाडा येथील घराबाहेर असलेल्या सार्वजनिक नळावर पाणी भरण्यासाठी गेल्या होत्या. त्यावेळी तेथे कविता प्रकाश भुरकूड ही पाणी भरत

होती. कविताने तीन ते चार हंडे भरल्यानंतर फिर्यादीने तिलासुध्दा पाणी भरु दे असे सांगितले असता कविताने तिच्या बरोबर भांडायला सुरुवात केली व भांडता भांडता ती घरात गेली व तिचा नवरा आरोपी प्रकाश भुरकूड याला घेवून आली. आरोपी तेथे आला व त्याने फिर्यादीच्या डोक्यावर त्याच्या हातातील कोयत्याने वार केला. म्हणुन फिर्यादीने आरोपीविरुध्द श्रीनगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

३. सदर फिर्यादीवरुन पोलिसांनी गुन्हा क्र I— २६४/२०१० भारतीय दंड विधान कलम ३२४ अन्वये नोंदवला. गुन्हयाचा तपास पोलिस हवालदार श्री आर. बी. मोरे यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदवले, घटनास्थळाचा पंचनामा केला. तपासाअंती आरोपीविरुध्द पुरेसापुरावा आल्याने त्याच्याविरुध्द दोषारोपपत्र सादर केले.

४. मी आरोपीवर नि. क्र ५ अन्वये भारतीय दंड विधान कलम ३२४अन्वये दोषारोप निश्चित केले. आरोपीनी गुन्हा कबूल नसल्याचे सांगून खटल्यास सामोरे जाण्याची तयारी दर्शविली.

५. आरोपीविरुध्द कोणताही पुरावा न आल्याने त्याचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ नुसार निवेदन नोंदविण्यात आले नाही.

६. सरकारी वकीलांचा युक्तिवाद, आरोपीच्या वकीलांचा युक्तिवाद व कागदोपत्री पुराव्यावरुन न्यायनिर्णय देतांना खालील मुददे उपस्थित होत असून त्यावरील निष्कर्ष कारणांसहीत नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष.** |
|---|---|---|
| १ | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, आरोपीने फिर्यादीच्या डोक्यात कोयत्याने वार करुन इच्छापुर्वक दुखापत पोचवली? | ...नाही |
| २. | आदेश काय? | ....आरोपीची निर्दोष मुक्तता. |

## :कारणमिमांसा:

**मुददा क्र. १ करिता :**

७. अभियोग पक्षाने आरोपीवरील दोषारोप सिध्द करण्यासाठी फिर्यादी चिताबाई गोविंद मोरे (सा.क्र.१) यांची साक्ष निशाणी क्र. ७ वर नोंदविली. त्यांनी त्यांच्या साक्षीत असे सांगितले आहे की, दिनांक २७/१०/२०१० रोजी त्या नळावर पाणी भरण्यासाठी गेल्या होत्या. नळाला एक तासच पाणी येत असल्याने तेथे खूप गर्दी जमलेली होती. त्या गर्दीमध्ये कोणाचे तरी भांडण चालू असताना त्यांना धक्का लागला व त्या खाली पडल्याने त्यांना डोळयाचे वर दुखापत झाली. आरोपीने त्यांना मारले नसल्याचे त्यांनी त्यांच्या साक्षीत सांगितले आहे.

८. फिर्यादीने अभियोग पक्षास सहकार्य केले नसल्याने अभियोग पक्षाने सदर प्रकारणामध्ये इतर साक्षीदारांना तपासले नाही. अभियोग पक्षाने तपासलेले एकमेव साक्षीदार फिर्यादी चिंताबाई मोरे त्यांच्या साक्षीद्वारे आरोपीविरुध्द अभिलेखावर सबळ पुरावा आलेला नाही. त्यामुळे आरोपीने फिर्यादीला कोयत्याने मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत केली हे सिध्द होत नाही. सबब मी मुददा क्र. १ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवत आहे व मुददा क्र. २ च्या उत्तरादाखल खालील आदेश पारित करत आहे.

## : आदेश :

१. आरोपी प्रकाश रमेश भुरकूड यांची भारतीय दंड विधान कलम ३२४ खालील दोषारोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. जप्त मुदद्देमाल लोखंडी विळा अपील कालावधीनंतर भंगारात विकून आलेली रक्कम सरकार जमा करावी.

३. आरोपींचे बंधपत्र रदद् करण्यात येत आहे.

दिनांक : २७.०५.२०१५ (प्र.प्र.भारसाकडे—वाघ)
ठाणे न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, (६ वे न्यायालय),ठाणे